## *Appendix XVII (xi)*, (Vide Article - 17.09)

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय.

---

परिपत्रक:

क्रमांक-कक्ष-१६/आर-३/ग्रेडींग रूल्स/३(१/८५-८६)/ १०५६
पुणे क्रमांक: ४११ ००१ दिनांक ऑक्टोबर ३०, १९८६.

विषय:- तुकडयांचे/बांडांचे उत्पादनाच्या समुपयोजनेसाठी एकसूत्र नियमावली व प्रमाणीकरण.

---

झाडांची तोड करुन त्यापासून इमारती नग काढल्यानंतर उरलेल्या शाखा विस्तार, पोट वराड्यामुळे टाकण्यात आलेले बोड तसेच सुरांकडील वराड्यामुळे शिल्लक राहिलेले तुकडे यापासून रचित बांडाच्या गोल्या, धण्यया, म्हार किंवा किटा इत्यादि तयार करण्यात येत असत. या समुपयोजनेच्या प्रकारात राज्यात एकसूत्रता आणण्यासाठी तसेच या मालाची योग्य रितीने उपयोगीता होण्याकरिता या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक -कक्ष-१६/ग्रेडींग/आर-३/३१०/९४५ जे, दिनांक १-१०-१९८४ अन्वये तुकडयांचे/बांडांचे[रचित] उत्पादनाच्या समुपयोजनेबाबतच्या सुचना सर्व संबंधितांकडे पाठविण्यात आली होती. सदर सुचनांची अंमलबजावणी करित असतांना असे अनुभवास आले की यातील रचित इमारती मालाच्या विक्रीवर विक्री कर लागु करण्यात आल्याने उत्तर व दक्षिण चंद्रपूर वन वृत्तातील सर्व वन विभागात व वन प्रकल्प विभागात, ठाणे वन वृत्तातील ठाणे, डहाणु व शहापूर वन विभागात व ठाणे, डहाणु वन प्रकल्प विभागात तसेच यवतमाळ वन वृत्तातील विभागात खरेदीदारांकडून/खरेदीदारांचे संघटनांकडून आक्षेप घेण्यात आलेत तसेच वर नमूद केलेल्या विभागातील काही लिलावांवर बहिष्कार टाकण्यात आला होता. सदर सुचनांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करित असतांना बऱ्याच अडचणी येत असल्याचे सुध्दा बऱ्याच अधिकाऱ्यांनी कथन केलेले आहे. अशा परिस्थितीत संदर्भीत नियमावली व प्रमाणीकरणाबाबत फेरविचार करणे आवश्यक वाटल्यावरुन त्याकरिता श्री व. कृ. सरवटे, अपर मुख्य वनसंरक्षक, मुल्यांकन व राष्ट्रीयीकरण, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समीती या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१६/ग्रेडींग रूल्स/आर-३/१/८५-८६/२२६, दिनांक २७-५-१९८६ अन्वये गठीत करण्यात आली. समीतीने प्रस्तुत विषयाच्या संबंधीत विचार करुन आपला अहवाल अपर मुख्य वनसंरक्षक, मुल्यांकन व राष्ट्रीयीकरण, नागपूर यांचे पत्र

-(पान दोन वर)-

क्रमांक-मु व रा/नि प्र/मुख्य/१६१/८६-८७, दिनांक २२-७-१९८६ अन्वये या कार्यालयास सादर केला. समीतीच्या अहवालाचा सर्वंकष विचार करून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

२.०.० <u>आदेश</u>

या कार्यालयाचे पत्र क्रमांक कअ-१६/ग्रेडींग आर-३/३१०/९४५ ,दिनांक १-१०-१९८४ अन्वये तुकड्याचे /खांड्याचे[रचित] उत्पादनाच्या समुपयोजनेसाठी एकसूत्र नियमावली व प्रमाणीकरण बाबतच्या दिलेल्या सूचना : रद्द समजण्यात याव्यात. त्याऐवजी खाली नमूद केलेली नियमावली त्वरित अंमलात आणावी.

३.०.० झाडांची तोड करून त्यापासून इमारती नग काढल्यानंतर उरलेल्या शाखा, विस्तार, पोट खराब्यामुळे फळण्यात आलेले शेंड व कुंदाळ्डील खराब्यामुळे शिल्लक राहिलेले तुकडे यापासून रचित खांड्याचा गंज्या, थप्पया, भर किंवा ढिग इत्यादी तयार करण्यात याव्यात आणि त्यांस खालील प्रमाणे संबोधण्यात यावे.

- सागवान [ इमारती ]
- प्रजाती [ इमारती ] -, मऊ प्रजाती
  - कठिण प्रजाती.
- प्रजाती [ जळाऊ ].

३.१.० वरील उत्पादनापैकी फक्त प्रजाती[जळाऊ] या वर्गीकृत मालाची विक्री "रचित" अवस्थेमध्ये करावी आणि इतर मालाची विक्री घनमिटर प्रमाणे म्हणजे घनफळानुसार करावी.

<u>४.०.०</u> <u>सागवान [इमारती ] बाबत.</u>

१५ सें.मी. ते ६० सें.मी. या घेरीवर्गातील मालाचे समुपयोजन करावे. ६० सें.मी. चे वरील माल प्रत्येक घनफळ काढून विकण्यात यावा.

<u>४.१.०</u> <u>छाननी</u>

सर्व छाननीयोग्य सागवान झाडांची प्रतवारी "इमारत" म्हणूनच छाननीचे नोंदी करावी.

-[ पान ३ वी वर]-

४.२.० घेरीवर्ग :

सागवान [इमारती] या मालासाठी १५ सें.मी. ते ३० सें.मी. चे आंत ३० सें.मी. ते ४५ सें.मी. चे आंत आणि ४५ सें.मी. ते ६० सें.मी. चे आंत असे तिन घेरीवर्ग वापरावे.

४.३.० लांबीवर्ग

नगाची कमीत कमी लांबी ०.५ मिटर आणि जास्तीत जास्त लांबी १.२ मिटर असावी.

४.४.० प्रतवारी:

३० सें.मि.ते ४५ सें.मी. चे आंत तसेच ४५ सें.मी.ते ६० सें.मी. चे आंत या घेरीवर्गातील तुकड्यांची प्रतवारी खालील प्रमाणे करावी.

प्रत-१ :- सरळ, भरीव व कमी गाठाळ तुकडे.

प्रत-२ :- बाकी राहिलेले [प्रत-१ सोडून] तुकडे.

४.५.० मोजमापाची पध्दत :

४.५.१ १५ सें.मी. ते ३० सें.मी.चे आंत या घेरीवर्गातील उत्पादन "रचित घनफळ" या तत्त्वानुसार काढण्यात यावे.

४.५.२. ३० सें.मी. ते ४५ सें.मी. चे आंत आणि ४५ सें.मी. ते ६० सें.मी. चे आंत. या घेरीवर्गातील मालासाठी प्रपत्र-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे लांबी व गोलाई यांचेसाठी कोड क्रमांक देण्यात आलेले असून व त्या कोड क्रमांकाचे घनफळ सुध्दा दर्शविण्यात आलेले आहे. सदर घनफळ तुकड्याची साल मध्यभागी काढून त्यानुसार घेतलेल्या मोजमापावरून काढण्यात आलेले आहे. तथापि प्रत्यक्षांत विक्रीचे वेळी मध्यभागाची साल काढू नये. सदर कोड क्रमांकावरून नगी, थप्पी, ढिग यांत असलेल्या नगांची संख्या व तदनुषंगिक सरासरी घनफळ काढावे. सदर मोजमापाची पध्दत जंगलातील समुपयोजनेचे वेळी तसेच विक्रीसाठी वापरण्यात यावी. समुपयोजनेच्या वेळी तुकड्यावर फक्त कोड नंबरचा शिक्का उठवावा.

४.६ विक्रीची पध्दत:-

४.६.१: १५ सें.मी.ते ३० सें.मी.चे आंत या घेरीवर्गातील माल बाजारात मागणी नसल्यास अपवाद म्हणून "रचित इमारती" म्हणून विकावा.

४.६.२. ३० सें. मी. ते ४५ सें.मी. चे आंत आणि ४५ सें.मी.ते ६० सें.मी. चे आंत. ^ यांचे आधारे एकुण घनफळ

-[पान ४ वर]-

या पेठीवर्गातील माल कोड क्रमांकाचे आधारे घनफळ काढून विकण्यात यावा. घनफळ कोड क्रमांकाचे आधारे काढलेले असल्याची माहिती खरेदीदारांना द्यावी.

४. ६. ३ सागवान [इमारती] या प्रतीचे सर्व उत्पादन मोठ्या विक्री आगारावर आणून विक्री करावी.

४. ६. ४ सर्व सागवान [इमारती] व मालाचे विक्रीकर नियमानुसार विक्रीकर तसेच वन विकास कर विक्री किंमतीचे व्यतिरिक्त घेण्यात यावा.

<u>५. ०. ० :</u> प्रजाती [इमारती] बाबत.

<u>५. १. ०:</u> ज्या छापणी योग्य प्रजाती झाडांपासून १ ते १. २ मि. लांबीचा चिरकामास योग्य असलेला कमीत कमी एक नग मिळु शकत असल्यास अशा झाडांची छापणी प्रजाती [इमारती] या वर्गात करावी. छापणी केलेल्या झाडांची तोड झाल्यानंतर मऊ प्रजाती [इमारती] व कठिण प्रजाती [इमारती] अशी वर्गवारी करावी.

<u>५.२.०</u> = <u>मऊ प्रजाती [इमारती]:</u>

५. २. १. या वर्गामध्ये ६० सें. मी. घेरीवरील आणि १ किंवा १. २ मि. लांबीचे सावर[सेमल], सलाई, मोवई, धावड, कलई, काटेऐन, करई, पारड व वगैरा या जातीच्या मालाचे तुकडे राहतील.

५. २. २. सदर प्रकारात फक्त चिरकामास योग्य असलेल्या तुकड्यांचाच समावेश असावा.

५. २. ३ : <u>मोजमापाची पध्दत :</u>

प्रत्यक्ष मोजमापाचे आधारे प्रत्येक तुकड्याचे घनफळ काढण्यात यावे.

५. २. ४ <u>विक्रीची पध्दत :</u>

सर्व मऊ प्रजाती [इमारती] माल एकत्रकरुन अथवा मागणी असल्यास जातवार विकावा. विक्री आगारावर मालाची विक्री करण्यात यावी.

<u>५. ३. ०.</u> <u>कठिण प्रजाती [इमारती]</u>

५. ३. १ या वर्गामध्ये ७५ सें. मी. घेरीवरील आणि १ किंवा १. २ मिटर

-[पान ५ पर ]-

लांबीचे बेर, शिवण, शिसम, बिजा, कळम, साजा/ऐन, व हळदू, धावडा, तिवस, कुर्वा, मोहा, मोवा, रोहन, भिरा, येहडा, चिचवा, गराडी इत्यादी जातीच्या मालाचे तुकडे राहतील.

५.३.२ सदर प्रकारात फक्त चिरकामास योग्य असलेल्या तुकड्यांचा समावेश असावा.

५.३.३ मोजमापाची पध्दत:

प्रपत्र -१ मधिल माहीतीचे आधारे यष्टीमध्ये असलेल्या नगांच्या संख्येच्या आधारे कोड क्रमांकानुसार घनफळ काढावे.

५.३.४ विक्रीची पध्दत :

मालाचे पेठीवर्गानुसार आणि जातवार गट करुन विक्री आगारावर विक्री करण्यात यावी.

५.४.० : या मालाचे विक्रीवर नियमानुसार विक्रीकर व वन विकासकर विक्री किंमतीचे व्यतिरिक्त घेण्यात यावेत.

६.०.० प्रजाती [जळाऊ ]

ज्या छाटणीयोग्य झाडापासून १ किंवा १.२ मिटर लांबीचा चिरकामास योग्य असा एकही तुकडा निघणार नाही म्हणजेच जे झाडे केवळ सरपण [जळाऊ] म्हणूनच उपयोगात येऊ शकतात अशी झाडे प्रजाती[जळाऊ] अशी वर्गवारी देऊन छापावीत. झाडांची तोड झाल्यानंतर झाडे मऊ प्रजाती [जळाऊ] व कठिण प्रजाती [जळाऊ] याप्रमाणे खाली दर्शविल्याप्रमाणे ठेवावीत.

६.१.० मऊ प्रजाती [जळाऊ ]

या वर्गामध्ये १ किंवा १.२ मिटर लांबीचे भावर[सेमल], सलाई, मोवई, काकड, कुमई, कोटैल, सर्ई, पारड व पांगरा या जातीच्या मालाचे तुकडे राहतील.

६.२.० कठिण प्रजाती ( जळाऊ )

या वर्गामध्ये १ किंवा १.२ मिटर लांबीचे बेर, सिसम, बिजा, हळदू, कळम, शिवण, साजा/ऐन, धावडा, तिवस, कुर्वा, मोहा, मोवा, रोहन, भिरा, येहडा, चिचवा, गराडी या जातीच्या मालाचे तुकडे राहतील.

-[पान ६ वर ]-

६.२.१ : प्रतवारी :

कठिण प्रजाती [जळाऊ] या मालाची प्रतवारी खालील प्रमाणे करावी.

प्रत – १ : सरळ व कमी गाठाळ तुकडे.

प्रत – २ : पोकळ तुकडे.

६.३.० घेरीवर्ग :

प्रजाती [जळाऊ] मधिल मऊ व कठिण या दोन्ही प्रकारच्या माला-साठी खालील प्रमाणे घेरीवर्ग करावेत.

१५ सें. मी. ते ३० सें. मी. चे आंत.

३० सें. मी. ते ६० सें. मी. आंत.

६० सें. मी. ते ९० सें. मी. चे आंत.

९० सें. मी. चे वर.

६.४.० मोजमापाची पध्दत :

प्रजाती [जळाऊ] मधिल मऊ व कठिण या दोन्ही प्रकारच्या मालासाठी "रचित घनफळ" ही मोजमापाची पध्दत वापरावी.

६.५.० विक्रीची पध्दत :

६.५.१ १५ सें. मी. ते ३० सें. मी. चे आंत आणि मऊ व कठिण प्रजाती [जळाऊ] या दोन्ही प्रकारचा माल विभागातर्फे सुरु करण्यात आलेल्या जळाऊ लाकडांचे विक्री केंद्रावर "ना नफा ना तोटा" या धर्तीवर विक्री-साठी किंवा स्थानिक रहिवाश्यांचे विशेष अधिकार विषयक गरजा भागविण्याकरिता उपयोगात आणाव्यात. वरील गरजा भागवूनही उत्पादन शिल्लक राहिल्यास मालाची विक्री "रचित घनफळ" या तत्वावर आणि केंद्र त्या विक्री आगारावर करण्यात यावी.

६.५.२ ३० सें. मी. ते ६० सें. मी. चे आंत, ६० सें. मी. ते ९० सें. मी. चे आंत आणि ९० सें. मी. चे वर या घेरीवर्गामध्ये मऊ व कठिण प्रजाती [जळाऊ] म्हणून वेगवेगळ्या रितया लॉट मांडणी करण्यास जास्तवार मट लावून "मध्यवर्ती जळाऊ आगारावर" मालाची विक्री "रचित घनफळ" या तत्वावर विक्री करण्यात यावी. असे मध्यवर्ती जळाऊ आगार इमारती मालाचे आगारापासून पूर्णपणे स्वतंत्र असावेत.

–[पान ७ वर]–

आगारातील प्रमाण गंजीचा आकार २ मीटर किंवा

६.५.३ मध्यवर्ती जळाऊ/१.४ मिटर रुंद दोन मिटर उंच आणि १० मिटर लांब असावा. अशा प्रमाण गंजीच्या चारही बाजुस १.५ मिटर रुंदीची मोकळी जागा असावी.

६.५.४ मध्यवर्ती जळाऊ आगाराचे चारही बाजुने नियमानुसार जाळ रेषा घेण्यात यावी.

७.०.० वरील आदेश झाडांची तोड करुन त्यापासून इमारती नग काढल्यानंतर उरलेल्या शाखा विस्तार, पोट बराड्यामुळे वगळण्यात आलेले झोड तसेच खुंटाकडील बराड्यामुळे शिल्लक राहिलेले तुकडे यापासुन तयार करावयाच्या रचित लाकडाच्या मालाबाबतचे आहेत. तथापि इमारती नगाचे प्रतवारी करण्यासंबंधीचे या कार्यालयाचे पत्र क्रमांक कअ-१६/ग्रेडींग रूल्स/२३०, दिनांक २३-९-१९८८ तसेच पत्र क्रमांक कअ-१६/१२००, दिनांक ३-३-१९८४ अन्वये दिलेले आदेश कायम राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

सहपत्र: प्रपत्र-१

[ व. के. प्रभु ]
मुख्य वनसंरक्षक [उत्पादन],
म. रा. पुणे.

प्रति,
अपर मुख्य वनसंरक्षक (मु.व.रा.)
वनसंरक्षक [प्रादेशिक] सर्व
प्रादेशिक व्यवस्थापक[प्रादेशीक] सर्व

प्रतिलिपी सहपत्रासह व्यवस्थापकीय संचालक, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कारपोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड, ६ अ नवाब लेआऊट, टिळक नगर, नागपूर ४४० ०१०, यांना माहीती करिता व योग्य कार्यवाईकरिता सस्नेह अग्रेषित.

[ व. के. प्रभु ]
मुख्य वनसंरक्षक [ उत्पादन ],
म. रा. पुणे.

पुरस
२८-१०-८९.

<u>प्रपत्र -१</u>

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक कक्ष-१६/आर-३/ग्रेडींग रूल्स/३.६१/[८५-८६], दिनांक .. ऑक्टोबर चे सहपत्र.

तुकडे / खांड/वासयाचे सरासरी घनफळ व कोड क्रमांक दाखविणारा तक्ता.

| घेरी गट<br>लांबी वर्ग-सें.मी. मध्ये --><br>लांबी गट मिटर मध्ये | कोड क्रमांक / सरासरी घनफळ<br>१५/३० सें.मी. ते ३०/४५चे आंत | <br>३०/४५चे आंत | <br>४५/६० चे आंत |
|---|---|---|---|
| ०.५० ते १.२० चे आंत | १<br>०.००२२९५ | ९<br>०.००७१४० | १७<br>०.०१४४५० |
| १.२० मिटर | २<br>०.००३२४० | १०<br>०.०१००८० | १८<br>०.०२०४०० |
| १.२० चे वर ते २ मि.चे आंत | ३<br>०.००४३२० | ११<br>०.०१३४४० | १९<br>०. २७२०० |
| २ मि. ते ३ मि. चेआंत | ४<br>०.००६७५० | १२<br>०.०२१००० | २०<br>०.०४५००० |
| ३ मि. ते ४ मि. चे आंत | ५<br>०.००९४५० | १३<br>०.०२९४०० | २१<br>०.०४९५०० |
| ४ मि. ते ५ मि. चे आंत | ६<br>०.०१२१५० | १४<br>०.०३७८०० | २२<br>०.०७६५०० |
| ५ मि. ते ६ मि. चे आंत | ७<br>०.०१४८५० | १५<br>०.०४६२०० | २३<br>०.०९३५०० |
| ६ मि. चे वर. | ८<br>०.०००२१७<br>× प्रत्यक्ष लांबी सें.मी. मध्ये | १६<br>०.००००८४<br>× प्रत्यक्ष लांबी सें.मी. मध्ये | २४<br>०.०००१७०<br>× प्रत्यक्ष लांबी सें.मी. मध्ये. |

टिप :- [१] कोड क्रमांकातील घनफळ हे प्रत्येक तुकड्याचे लांबी वाली मध्य घेरी माप घेतल्याप्रमाणे आहे.

[२] कोड क्रमांक-१ ते ४ चे "पुरानी इमारत" म्हणून वर्ग करू नये.

[३] सागवान जातीसाठी कोड क्रमांक-१७ ते २४ करिता प्रत्यक्ष मोजणी करून घनफळ काढावे.